ISSN 229-3256

# यशदा यशमंथन

एप्रिल-जून २०२२

। वर्ष १६ वे । अंक २ रा । मूल्य : रु. २०/-



गडचिरोलीचे सीईओ
कुमार आशीर्वाद यांनी राबवलेला

## मुलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठीचा अभिनव उपक्रम
# फुलोरा

यशदा
यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे

देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड

Principal
A V Education Society's
Degloor College Degloor

यशदा

एप्रिल-जून २०२२

वर्ष १६ वे । अंक २ रा

मूल्य : रु. २०/-

प्रेरणा
एस. चोक्कलिंगम्, भाप्रसे
महासंचालक

मार्गदर्शन
विशाल सोळंकी, भाप्रसे
अति.महासंचालक

प्रताप जाधव, भाप्रसे
उपमहासंचालक

डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, भाप्रसे (नि.)
उपमहासंचालक

संपादक
डॉ. बबन जोगदंड
संशोधन अधिकारी (प्रकाशन)

मांडणी व सजावट
संजीवनी रणदिवे

३ वर्षांची वर्गणी रु. २००/-

# यशदा यशमंथन

ISSN 222

एप्रिल-जून २०२२ । वर्ष १६ वे। अंक २ रा । मूल्य : रु. २०/-

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| ■ प्रशासकीय कार्यसंस्कृतीचे संवर्धन | : प्रा. डॉ. बी. आर. कत्तुरवार | ०३ |
| ■ प्रशासकीय अधिकार पदे: महिलांचे स्थान आणि प्रमाण | : डॉ. प्रीती पोहेकर | ०७ |
| ■ गडचिरोलीचे सीईओ कुमार आशीर्वाद यांनी राबविलेला 'फुलोरा' शैक्षणिक उपक्रम | : डॉ. बबन जोगदंड | ११ |
| ■ देहबोली | : अंजली धानोरकर | १४ |
| ■ प्रशिक्षणाचा आराखडा कसा तयार करावा | : डॉ. मनोज कुलकर्णी | १६ |
| ■ भावनांचे समायोजन आणि व्यवस्थापन | : प्रा. जीवन मुळे | २० |
| ■ मानसिक आजार | : डॉ. प्रफुल्लचंद्र चौधरी | २२ |
| ■ कायद्याचे राज्य आणि समान न्याय | : राजीव नंदकर | २६ |




फिनलंडची अनोखी शिक्षण पद्धती
डॉ. अरविंद कुलकर्णी

यशदा यशमंथनसाठी लेख, वर्गणी, जाहिरातीसाठी पत्ता :
संशोधन अधिकारी (प्रकाशन), यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा),
राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे ४११ ००७. दूरध्वनी : ०२०-२५६०८२२७
ई-मेल : editoryashmanthan@yahoo.in वेबसाइट: http://www.yashada.org

या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक व 'यशदा' सहमत असेलच असे नाही.

महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड

Principal
A V Education Society's
Degloor College Degloor



–प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार

# प्रशासकीय कार्यसंस्कृतीचे संवर्धन

**कोणत्याही देशातील प्रशासन व्यवस्था ही तेथील मानवी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी अखंडपणे काम करीत असते. प्रशासन व्यवस्था ही त्या देशातील समाज व्यवस्थेच्या विकासाचे महत्त्वपूर्ण साधन होय. अर्थात प्रशासन व्यवस्थेची उभारणी करताना त्या त्या देशाची संस्कृती, इतिहास, राजकीय व्यवस्था, सामाजिक व्यवस्था, अर्थव्यवस्था इत्यादींचा सखोल अभ्यास करूनच प्रशासन व्यवस्था निर्माण केली जाते. या प्रशासकीय कार्यसंस्कृतीचे कसे संवर्धन करणे अपेक्षित आहेत याची मांडणी प्रस्तुत लेखात करण्यात आली आहे...**

लोकप्रशासन व्यवस्थेतील अधिकाऱ्यांचा आपल्या कार्याविषयी असलेला दृष्टीकोन, सामान्य लोकांशी ते कसे वागतात? कोणत्या नीतीमूल्यांची कास धरतात? कोणत्या मानसिकतेतून काम करतात? मानवी संवेदना कितपत आहे? इत्यादी वरूनच त्या देशातील प्रशासकीय संस्कृती (Administrative Culture) लक्षात येत असते. विशेष म्हणजे प्रशासन व्यवस्था ही सांस्कृतिक मूल्यांच्या आधारेच निर्माण करण्यात आलेली असते. प्रशासन व्यवस्था देखील संस्कृतीप्रिय अथवा संस्कृतीनिष्ठ असते. आपल्या भारत देशातील प्रशासन व्यवस्थेचा तटस्थपणे अभ्यास केल्यास प्रशासकीय अधिकाऱ्याची भूमिका ही अत्यंत महत्त्वपूर्ण आढळून येते. प्रशासन व्यवस्थेसाठी प्रशासकीय संस्कृती हे एक महत्त्वपूर्ण पण गुंतागुंतीचे तत्त्व असते. विशेष म्हणजे प्रशासकीय अधिकारी वर्ग हा संघटित असतो. हा वर्ग आपली गुणवत्ता सिद्ध करून एका समानतेच्या तत्त्वाने प्रशासनात सहभागी झालेला असतो. त्यामुळे हा संघटित वर्ग एकमेकांशी जवळीकता निर्माण केलेला असतो. तो सतत परस्पर संपर्क साधत असतो. त्यातूनच काही आचरणासंदर्भातील मानके किंवा मापदंड निर्माण होत असतात. प्रशासनातील अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन, मानसिकता व वर्तन यावरून त्याची प्रशासकीय संस्कृती जाणून घेता येते.

### प्रशासकीय संस्कृतीचा अर्थ

'प्रशासकीय संस्कृती' हा शब्द आपणास नवीन वाटत असला तरी तो मुळ संस्कृतीशी निगडित आहे. कारण प्रत्येक देशातील प्रशासन व्यवस्था ही त्या देशाच्या सांस्कृतिक




Principal
A V Education Society's
Degloor College Degloor

वाढेल.

मानवाची जिज्ञासू वृत्ती, कल्पक विचार, नवनवीन कल्पना ह्या बाबी ज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असतात. आजचे युग हे गतिमान आहे. लोकांच्या प्रशासनाकडून अपेक्षा वाढत आहेत. कार्पोरेट संस्कृती प्रशासनात येत आहे. लोक कामासाठी थांबायला किंवा प्रतिक्षा करायला तयार नाहीत, अशा वेळी प्रशासकाला आपली भूमिका बदलणे गरजेचे आहे. प्रशासनातील विविध कामे करताना आपल्या कल्पकतेचा व सर्जनशीलतेचा उपयोग करून अधिकाधिक लोकांचे हीत जोपासून कार्य नवीसंस्कृती विकसित करावी लागेल.

३) **कामामध्ये व्यावसायिकता आणावी**

भारतीय समाज मानसिकतेत नोकरी आणि व्यवसाय या भिन्न बाबी समजल्या जातात. इतकेच नव्हे तर व्यवसाय आपला आणि नोकरी दुसऱ्यासाठी अशी भावना दिसून येते. व्यवसायात व्यक्ती समर्पित भावनेने किंवा जीव ओतून काम करीत असतो, त्याप्रमाणे खाजगी व्यवसायात जितकी कार्याची बांधीलकी असते, व्यावसायिकता असते, त्याप्रमाणे नोकरीच्या ठिकाणी तळमळ व व्यावसायिक्ता निर्माण होणे गरजेचे आहे.



४) **कार्यालयीन स्वच्छतेला महत्त्व द्यावे**

प्रशासकीय संस्कृती व कार्य संस्कृतीवर सतत प्रभाव टाकणारा घटक म्हणजे कार्यालयीन स्वच्छता होय. त्यामुळे स्वच्छता देखील एक प्रशासकीय संस्कार होय. आपण ज्या ठिकाणी आठ ते दहा तास काम करीत असतो ती जागा व परिसर स्वच्छ असणे गरजेचे असते. जर कार्यालयात प्रचंड अस्वच्छता असेल तर तिथे प्रसन्नता राहू शकत नाही. कार्यालय सुव्यवस्थित, स्वच्छ, टापटीप व प्रसन्न ठेवले तर त्यामुळे कार्यात उत्साह वाढतो, पर्यायाने कार्यसंस्कृती व प्रशासकीय संस्कृती संवर्धित होते.

५) **शुद्ध व नैतिक आचरण**

प्रशासनात काम करीत असताना कमी ज्ञान, कौशल्याचा अभाव, या सारख्या बाबी असतील तर फारसा फरक पडत नाही पण एखाद्या व्यक्तीचे आचरण नैतिक चौकटीच्या आत नसेल तर तो अधिकारी कनिष्ठांवर प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकत नाही. नैतिक आचरण हाच प्रशासकीय संस्कृतीचा पाया असतो. प्रत्येक कृती करताना कायदा व नियमांचा आधार तर घ्यायलाच हवा पण त्याचबरोबर नैतिक दृष्टीकोनातून त्याकडे पाहणे गरजेचे आहे.

**सारांश**

प्रशासकीय संस्कृती व कार्य संस्कृतीची माहिती आपण जाणून घेतल्यानंतर त्याच्या संवर्धनाची मुख्य जबाबदारी कोणाची? असा प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक आहे. अर्थात 'यथा राजा तथा प्रजा' या तत्वानुसार प्रशासनात देखील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या वर्तनाचे अनुकरण कनिष्ठ कर्मचारी करीत असतात. त्यामुळे वरिष्ठांनी आदर्श व प्रामाणिक आचरण करून कार्यसंस्कृती व प्रशासकीय संस्कृती संवर्धित केली पाहिजे.

प्रशासनव्यवस्था अधिकाधिक पारदर्शक, गतिशील व स्वच्छ बनविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रशासकीय सेवेत कार्यरत असलेल्या व नव्याने प्रशासकीय सेवेत येणाऱ्या व्यक्तींना वेळोवेळी प्रशिक्षण देवून कार्यसंस्कृती विकासित केली पाहिजे. प्रशासनात काम करीत असताना जनतेची कामे अधिकाधिक पारदर्शकपणे व जलदगतीने होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रशासनातील अधिकारी-कर्मचारी वर्गाला कार्यसंस्कृती व प्रशासकीय संस्कृतीचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे.

**प्रा.डॉ.बी.आर.कत्तुरवार**
लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्र प्रमुख
देगलूर महाविद्यालय देगलूर जि.नांदेड
संपर्क : ९४२३३०५८७०
ईमेल : brkattruwar@gmail.com



Principal
A V Education Society's
Degloor College Degloor